# <u>नियमित दिवाणी दावा नं. ११४/२०१३ मधील नि. ४५ खालील आदेश</u>

<u>CNR– MHST 070009552013</u>

दत्तात्रय वसंत उर्फ यशवंत पाटील वि. वसंत उर्फ यशवंत ज्ञानू पाटील व इतर

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. २. बाबुराव दादू पाटील हे दि. ०३/०९/२०२० रोजी मयत झाले आहेत. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ३ हा प्रतिवादी क्र. २ यांचा एकमेव वारस असून तो यापूर्वीच अभिलेखावर सामील आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. २ यांचे नावास कंस करुन त्यापुढे मयत असा मजकूर समाविष्ट करणेचा आहे. तसेच प्रतिवादी क्र. ११ सौ.संगिता हिचे नाव चुकलेले असून त्या नावास काट देवून सौ. निलम अशी दुरुस्ती करणेची आहे. प्रस्तुतची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असल्यामुळे सदर दाव्याच्या मागणीत कसल्याही प्रकारचा बदल होत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस विनंती आहे.

२. प्रतिवादी क्र.४ यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जावर दाखल करुन, सदरचा अर्ज हा खोटा व लबाडीचा असून तो फेटाण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत प्रकरणातील उर्वरित प्रतिवादींना वेळोवेळी संधी देवून देखील त्यांनी त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जावर दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज उर्वरित प्रतिवादींविरुद्ध विना म्हणणे चालविण्यात आला.

४. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी २ हे मयत असून, त्यांचे वारस हे यापूर्वीच अभिलेखावर दाखल आहेत. तसेच प्रतिवादी क्र. ११ सौ.संगिता हिचे नावात देखील वादीने दुरुस्ती सुचविलेली आहे. सदरच्या दोन्ही दुरुस्त्या या तांत्रिक स्वरुपाच्या असल्याने दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. उलट सदरची दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या

संपुष्टात आणण्यासाठी आवश्यक आहे. परंतु, प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास केलेला उशीर विचारात घेता वादीने प्रतिवादी क्र. ४ यांस रुपये ५००/– व तालुका विधी सेवा समिती, कराड यांच्याकडे रुपये ५००/– खर्च म्हणून दिल्यास मंजूर करणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

**आ दे श**

१. अर्ज (नि.४५) वादीने प्रतिवादी क्र. ४ यांस रुपये ५००/– व तालुका विधी सेवा समिती, कराड यांच्याकडे रुपये ५००/– खर्च दिल्यास मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांनी सदरील आदेशाप्रमाणे प्रस्तुत अर्जात नमूद दुरुस्ती १४ दिवसांच्या मुदतीत दाव्यामध्ये करुन त्याची दुरुस्ती प्रत अभिलेखावर त्याच दिवशी दाखल करावी.

BHAGWAT MAMTARAM VALIBA

Digitally signed by BHAGWAT MAMTARAM VALIBA
Date: 2023.08.17 15:46:29 +0530

स्थळ : कराड ( एम.व्ही.भागवत )

दिनांक :– १७/०८/२०२३ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड.